तसेच ज्यांची खरेदीखते आढळुन आली त्यापैकी २५ पंचविस शेतकऱ्यांनी व खरेदीखतांवरील साक्षीदारांनी ती खरेदीखते व्याजाने घेतलेल्या रक्कमेस आड म्हणुन करून दिल्याचे त्यांचे चौकशी अधिका-यांना

दिलेल्या लेखी जवाबात लिहुन दिलेले आहे. तसेच ५ प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांनी श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांचेकडुन कर्ज घेऊन त्यांना जमिनीचे खरेदीखत करून दिले व त्या शेतकऱ्यांनी कर्जाची सव्याज परत फेड केल्या नंतर श्री विसपुते यांनी त्याच शेतकऱ्यांना अथवा त्या शेतकऱ्याच्या कुटुंबातील सदस्यांना त्याच जमिनी पलटवुन देण्या बाबतचे खरेदीखत करून दिलेले असल्याचेही सिध्द झालेले आहे. तसेच सदर तक्रार अर्जात उल्लेख असलेले शेतकरी व त्यांच्या खरेदीखतावरील साक्षीदारांनी प्रत्येकी रू. १०० च्या बाँन्डवर श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांनी व्याजाने पैसे दिल्या बाबतची शपथपत्रे सादर केलेली आहेत. तसेच सदर प्रकरणी मा. तहसिलदार, सिल्लोड यांना केलेल्या विनंती नुसार त्यांनी काही शेतकऱ्यांच्या जमिनीच्या ताब्याबाबत संबंधीत तलाठ्यांकडुन करवुन घेतलेल्या पंचनाम्यांनुसार शेतकऱ्यांनी खरेदीखत करून दिलेल्या जमिनींचा ताबा श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांचेकडे नसुन त्या शेतकऱ्यांकडेच असल्याचे निदर्शनास आले आहे. या वरून श्री. लक्ष्मण भिका विसपुते, रा. तळणी, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद हे बेकायदेशीर रित्या सावकारी करीत असल्याचे चौकशी अंती दिसुन येते असा अहवाल सादर केला आहे

गैरअर्जदार यांचे राहते घराची दि.१४/८/२०१४ रोजी चौकशी अधिकारी यांनी घेतलेल्या घरझडती मध्ये श्री. रघुनाथ महादु कावले रा.शिंदेफळ ता.सिल्लोड यांचे शिन्देफळ शिवारातील गट नं.२६५ मधील ५६ आर शेतजमीनीची खरेदीखत क्र.२०१९ दि.४/४/२००१ आढळुन आले त्यामुळे श्री. रघुनाथ महादु कावले रा.शिंदेफळ ता.सिल्लोड स्वतः हजर होऊन खालील प्रमाणे लेखी / तोंडी म्हणणे मांडले

ज्या अर्थी गैरअर्जदार श्री लक्ष्मण भिका विसपुते यांनी उपरोक्त अहवालानुसार अवैध सावकारी करून अनेक शेतक-यांच्या जमिन खरेदीखताव्दारे गहाण खत करून घेतल्याचे आढळून आल्यामूळे घरझडती मध्ये आढळून आलेले खरेदीखतामधील संबंधिताचे म्हणणे व त्यावर गैरअअर्जदाराचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी **संदर्भ क्र.५** अन्वये अर्जदार श्री. रघुनाथ महादु कावले रा.शिंदेफळ ता. सिल्लोड जि. औरंगाबाद यांना लेखी / तोंडी म्हणणे मांडण्यासाठी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ कलम १८ नुसार दि.१७/११/२०१४, दि.२/१२/२०१४ व दि.२२/१२/२०१४ रोजी संबंधिताची सुनावणी ठेवण्यात आली.

ज्याअर्थी संदर्भ क्र.६ अन्वये श्री. रघुनाथ महादु कावले रा.शिंदेफळ ता. सिल्लोड जि. औरंगाबाद यांनी दि.२/१२/२०१४ रोजी लेखी आणि दि.१७/११/२०१४ व २२/१२/२०१४ सुनावणी मध्ये म्हणणे सादर केले की,मी शिंदेफळ येथील रहिवासी असून व्यवसायाने शेती करीत आहे.सन २००१ मधे मला पैशाची गरज पडल्याने मी तळणी येथील खाजगी सावकार लक्ष्मण भिका विसपुते यांच्याकडून रू.५०,०००/-(अक्षरी पन्नास हजार रूपये) दरमहा दरशेकडा १०% दराने व्याजाने घेतले होते. या व्यवहारास धर म्हणून मी त्यांना माझे नांवे असलेली शिन्देफळ शिवारातील सर्वे नं.२६५ मधील ५६ आर शेतजमीन दिनांक ०४/०४/२००१ रोजी पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर त्यांचे नावे करुन दिलेली आहे. रक्कमेवरील व्याज नियमित पणे दरमहा द्यावयाचे होते.श्री.लक्ष्मण भिका विसपुते व आमच्या मध्ये जमिन दखरेदी विक्रीचा व्यवहार झालेला नव्हता शेतजमिननीच्या रजिष्ट्रीवर जि किंमत टाकलेली आहे.ती शासन नियमानुसार टाकलेली आहे. पैशाचे व्याज मी त्यांना दरमहा दरशेकडा १०% प्रमाणे नियमितपणे दिलेले आहे. तसेच आमचा खरेदी विक्रीचा व्यवहार झालेला नव्हता. आपसातील तोंडी व्यवहारानुसार सदर जमिन पैशाची परतफेड झाल्यावर ही गहाण ठेवलेली शेतजमिन परतवुन देणे बाबत ठरलेले होते. रक्कमेस धर म्हणुन जमिन त्यांचे नावाने लिहुन दिली होती. तरी शेतजमिन माझेच ताब्यात होती व आहे. सदर व्याजाने घेतलेल्या रकमेवरील व्याज व मुददल मिळुन टप्याटप्यात सन २००४ पर्यंत रु. १२५०००/- अक्षरी रु एक लक्ष पंचवीस हजार मात्र गैरअर्जदारास दिलेले आहेत. घेतलेली रक्कम व्याजासह परत केल्यामुळे त्यांनी गैरअर्जदारास त्यांची शेतजमिन परत करण्याबाबत पलटवुन देण्यासाठी वारंवार विनंती केली असता आज उदया करुन देतो म्हणुन जमिन परत पलटवुन नावावर करुन देण्यास

टाळाटाळ केली व त्यांच्याकडे आणखी रकमेची मागणी केली. गैरअर्जदार श्री. लक्ष्मण विसपुते हे व्याजाने पैसे देण्याचा धंदा करतात. व त्याबदल्यात शेतक-यांचे कोरे चेक व शेतजमिनीच्या रजिस्ट्री करुन घेतात. त्यांनी त्यांची शेतजमिन गैरअर्जदार यांना विक्री केली नसुन व्याजाने घेतलेल्या रक्कमेस धर म्हणुन लिहुन दिली होती. ही शेतजमिन त्यांचेच ताब्यात आहे. याबाबत तलाठी सजा शिंदेफळ यांना स्थळपाहणी करुन पंचनामा केला आहे. पंचनामा दि. ११/९/२०१४ रोजी केलेला आहे. खरेदीखतातील साक्षीदारांचे जबाबत रु. १००/- बाँडवर दिलेले असुन त्यावरही सदरील व्यवहार हा सावकारी व्यवहार असल्याचे नमुद आहे. वरील रु. १२५०००/- हे परत करण्यासाठी त्यांनी त्यांचे पत्नीचे नावावरील जमिन विक्री (२००६-२००७) करुन पैसे परत दिले होते. म्हणुन त्यांची जमिन परत करावी. असे म्हणणे मांडले आहे. तसेच त्यांचे २/१२/२०१४ चे लेखी म्हणणे ग्राहय धरावे असे नमुद केले.

तसेच दि.२२/१२/२०१४ रोजी सुनावणी दरम्याण उपस्थित गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांनी तोंडी युक्तीवादात असे म्हणणे मांडले की,त्यांना इतर इसमाची एक एकर जमिन (प्रेमचंद भागचंद) यांची जमिन घ्यावयाची होती व ती त्यांनी घेतली. त्या जमिनीचे पैसे त्यांनी त्यांना त्यांची ५६ आर जमिन विक्री करुन मिळालेले पैसे श्री. प्रेमचंद भागचंद यांना दिले. त्यात सावकारीचा काहीएक सवाल नाही. त्यांनी रोख रक्कम सरकारी नियमाप्रमाणे त्यांना दिले व सदरील शेतजमिनीवर आजही माझाच ताबा आहे. पैशाच्या देण्याघेण्याबददल यापुर्वी तक्रार मांडलेली नाही. व्यवहार हा खरेदीविक्रीचा आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र.३ नुसार चोकशी अहवालात नमुद प्रमाणे श्री. रघुनाथ महादु कावले रा.शिंदेफळ ता. सिल्लोड जि. औरंगाबाद यांनी दिनांक २६/०८/२०१४ रोजी चौकशी अधिकारी यांना जवाब लिहुन दिलेला आहे. तोच जवाब रू. १०० च्या बॉन्डवर दोन साक्षीदारा समक्ष व या कार्यालयातील दिनांक २/१२/२०१४ रोजीच्या सुनावणीवेळी सादर केला आहे. त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, त्यांना सन २००१ मध्ये पैशाची गरज पडल्याने त्यांनी तळणी येथील सावकार श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांचेकडुन रू. ५००००/- १०% व्याजाने घेतलेले होते. उक्त तक्रारीस अनुसरून श्री. रघुनाथ महादु कावले रा. शिंन्देफळ ता. सिल्लोड यांनी दोन साक्षीदार समक्ष व माझे समक्ष दिनांक २६/०८/२०१४ रोजी जवाब लिहुन दिलेला आहे. त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, त्यांना पैशाची गरज पडल्याने त्यांनी तळणी येथील सावकार श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांचेकडुन सन २००१ मध्ये रू. ५००००/- १०% व्याजाने घेतलेले होते. या बदल्यात या व्यवहारात आड म्हणुन त्यांनी त्यांचे नावे असलेली शिंन्देफळ शिवारातील सर्वे नंबर २६५ मधील ५६ आर शेतजमिन त्याचे नावाने परत पलटवुन देण्याची तोंडी बोली ठेऊन करून दिलेली आहे. पैशास व्याज असल्याने सन २००१ पासुन सदरची जमिन त्यांच्याच ताब्यात आहे. व त्याजमिनीवर ते पिक घेत आहे. २००४ पर्यंत रकमेचा हिशोब करून त्यांनी रू. १२५०००/- परत केलेले आहे. तथापी सदर सावकार आज उदया असे करून जमिन परत पलटवुन देत नाही. व जमिन विकण्याची धमकी देत आहे. व्याजाने घेतलेल्या रक्कमेचा व्याजासह हिशोब त्यांनी सावकारास रोखीने दिलेला आहे. या व्यवहारात गावातील रमेश हरिशचंद्र वाघ व कुशाबा आनंदा शिन्दे हे साक्षदार आहेत. त्यांमुळे त्यांनी वरील प्रमाणे जवाब लिहुनदेऊन नियमा प्रमाणे कार्यवाही व्हावी या साठी जवाब लिहुन दिलेला आहे.

या व्यवहारातील साक्षदार श्री. रमेश हरीचंद्र वाघ रा. शिन्देफळ यांनी दिनांक २६/०८/२०१४ रोजी जवाब लिहुन दिला आहे. त्यांत त्यांनी असे नमुद केले आहे की, श्री. रघुनाथ महादु कावले व श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांचे व्यवहारात ते साक्षदार आहे. श्री. रघुनाथ महादु कावले यांना घरगुती कामासाठी पैशाची आवश्यकता असल्याने त्यांनी तळणी येथील सावकार श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांचेकडुन रू.५००००/- १०% या व्याज दरावर घेतले होते. सदर रकमेस धर म्हणुन त्यांनी त्यांचे शिन्देफळ शिवारातील गट नं. २६५ मधील ५६ आर शेतजमिन मुद्दल व व्याज परत फेड झाल्यावर जमिन पलटवुन देण्यांच्या तोंडी बोलीवर खरेदीखत करून दिलेले आहे. पैशास व्याज

असल्याने जमिन श्री. रघुनाथ महादु कावले यांच्याच ताब्यात मुद्दल व व्याज फिटेपर्यंत राहणार होती. व रक्कम परत फेड झाल्यावर जमिन पुन्हा पलटवुन त्यांचे नावावर करण्यांत येणार होती. असा सावकारी व्यवहार त्यांच्यात झालेला असल्या बाबत त्यांनी समक्ष जवाब लिहुन दिलेला आहे.

अर्जदार श्री.रघुनाथ महादु कावले रा.शिंन्देफळ ता.सिल्लोड यांनी दिनांक २२/१२/२०१४ रोजीच्या सुनावणी हजर राहुन नमुद केले की,मी सन २००१ मध्ये मला पैशाची गरज पडज्ल्याने मी तळणी येथिल खाजगी सावकार गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांचे कडुन रु.५००००/-अक्षरी पन्नस हजार मात्र दरमहा दरशेकडा १०% दराने व्याजाने घेतले होते.या व्यवहारास धर म्हणुन मी त्यांना माझे नावे असलेली शिंन्देफळ शिवारातील सर्वे नं.२६५ मधील ५६ आर शेतजमीन दि.४/४/२००१ रोजी त्यांचे नावे करुन दिली होती यावरील व्याज दरमहा द्यावयाचे होते गैरअर्जदार व माझेमध्ये जमीनीचे खरेदी विक्रीचा व्यवहार झालेला नव्हता शेतजमीनीची टाकलेली रजीस्ट्रीवरील किंमत ही शासन नियमा प्रमाणे होती.ती मला मिळालेली नव्हती आपसा ातील तोंडी व्यवहारानुसार सदर जमीन पैशाची परतफेड झाल्यावर ही गहाण ठेलेवलेली शेतजमीन पलटवुन देणे बाबत ठरलेले होत.सदर रक्कमेस धर म्हणुन जमीन त्यांचे नावाने लिहुन दिली होती.तरी शेतजमीन माझेच ताब्यात होती आहे. सदर व्याजाने घेतलेल्या रकमेवरील व्याज व मुद्दल मिळुन टप्याटप्यात सन २००४ पर्यंत रु. १२५०००/- अक्षरी रु एक लक्ष पंचवीस हजार मात्र त्यांना दिलेले आहेत. घेतलेली रक्कम व्याजासह परत केल्यामुळे मी त्यांना माझी शेतजमिन परत करण्याबाबत पलटवुन देण्यासाठी वारंवार विनंती केली असता आज उदया करुन देतो म्हणुन जमीन परत पलटवुन नावावर करुन देण्यास टाळाटाळ केली व माझ्याकडे आणखी रक्कमेची मागणी केली.

सदर खरेदी खतामधील साक्षीदार श्रह रमेश हरिचंद्र वाघ रा.शिंन्देफळ ता.सिल्लोड यांनी रु.१००/चे बॉन्डपेपरवर दिनांक १२/१२/२०१४ अन्वये दिलेला असुन त्यात नमुद केले आहे की,श्री.रघुनाथ महादु कावले रा शिंन्देफळ ता.सिल्लोड व श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा तळणी यांचे सावकारी व्यवहारात मी साक्षीदार आहे.श्री.रघुनाथ महादु कावले यांनी सन २००१ मध्ये रु.५००००/-अक्षरी पन्नास हजार रुपये श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांच्याकडुन व्याजाने घेतलेले होते या पैशास धर म्हणुन त्यांनी त्यांची शिंन्देफळ शिवारातील गट नं.२६५ मधील ५६ आर शेतजमीन परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांच्या नावाने खरेदीखत करुन दिलेले होते.सदर व्याजाने घेतलेल्या रक्कमेची मुद्यल व व्याजासह परतफेड झाल्यावर श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांच्या नावाने लिहुन दिलेली जमीन पुन्हा श्री.रघुनाथ महादु कावले यांच्या नावाने रजीस्ट्री परत पलटवुन व्यवहारापोटी पैशास धर म्हणुन जमीन त्यांच्या नावाने करुन दिलेली होती.श्री.रघुनाथ महादु कावले यांनी मला असे सागिंतले आतापर्यंत मी सावकार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांना रु.१२५०००/-अक्षरी एक लाख पंचविस हजार मात्र त्यांनी परत केलेले आहे.श्री.रघुनाथ महादु कावले व लक्ष्मण भिका विसपुते यांच्या मध्ये जमीन परत पलटवुन देण्याचा तोंडी व्यवहार झालेला होता.सावकारी व्यवहार असल्याने व पैशास व्याज असल्याने श्री.रघुनाथ महादु कावले यांच्याच ताब्यात राहणार होती आजही सदरची जमीन त्यांचेच ताब्यात आहे.व ते सदर जमीनीवर पिके घेत आहे.श्री.विसपुते यांच्या नावाने ज्यावेळी रजीस्ट्री करण्यात आली होती त्यावेळी दुययम निबंधक यांच्यासमोर मि रजीस्ट्रीवर साक्षीदार म्हणुन सही केलेली आहे.वरील प्रमाणे त्यांच्यात जो व्यवहार झालेला आहे तो जबाब रुपात लिहुन दिलेला आहे.

सदरचे खरेदीखत करते वेळी खरेदीखत करून देणारे व करून घेणारे यांच्यात सावकारी व्यवहार झालेला असुन खरेदी खतावर टाकण्यांत आलेली रक्कम शासन दरानुसार टाकण्यात आलेली आहे तेवढी रक्कम प्रत्यक्ष खरेदीखत करून देणार यांना देण्यांत आलेली नाही. खरेदी खत करून देणार व घेणार यांच्यात मुद्दल व व्याजाच्या रकमेची परत फेड झाल्यावर त्यांनी करून दिलेल्या शेतजमिनीची रजिस्ट्री परत करून देणाऱ्याच्या नावाने पलटवुन देण्यांचे तोंडी ठरलेले होते. वरील खरेदीखत सावकारी व्यवहारातुन झालेले असल्याने आज ही या

शेतजमिनी खरेदीखत करून देणार यांच्यात ताब्यात आहे. व ते त्यावर पिक घेत आहे. श्री.बाबु शंकर बावस्कर यांनी मुद्दल व व्याजाची परत फेड केलेली असल्याने त्यांना शेतजमिनीची रजिस्ट्री पलटवुन देण्यांत आलेली आहे. असा जवाब लिहुन दिलेला आहे.

हे खरेदीखत करते वेळी खरेदीखत करून देणारे व करून घेणारे यांच्यात सावकारी व्यवहार झालेला असुन खरेदी खतावर टाकण्यांत आलेली रक्कम शासन दरानुसार टाकण्यात आलेली आहे तेवढी रक्कम प्रत्यक्ष खरेदीखत करून देणार यांना देण्यांत आलेली नाही. खरेदी खत करून देणार व घेणार यांच्यात मुद्दल व व्याजाच्या रकमेची परत फेड झाल्यावर त्यांनी करून दिलेल्या शेतजमिनीची रजिस्ट्री परत खरेदी खत करून देणाऱ्याच्या नावाने पलटवुन देण्यांचे तोंडी ठरलेले आहे. वरील खरेदीखत सावकारी व्यवहारातुन झालेले असल्याने आज ही या शेतजमिनी खरेदीखत करून देणार यांच्यात ताब्यात आहे. व ते त्यावर पिक घेत आहे. असा जवाब लिहुन दिलेला आहे.

सदर प्रकरणी प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी सविस्तर चौकशी केलेली असुन चौकशी अंती चौकशी अधिकारी यांनी पुढील प्रमाणे चौकशी निष्कर्ष दिले आहे.या प्रकरणात ज्यांचे विरूध्द अवैध सावकारी बाबत तक्रार करण्यांत आलेली आहे, ते श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांचे तळणी, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद येथील राहत्या घराच्या दिनांक १४/०८/२०१४ रोजी घेण्यांत आलेल्या घरझडती मध्ये इतर शेतकऱ्यांचे सहया केलेले व न केलेले कोरे धनादेश,-२३ सहया केलेले व न केलेले कोरे बॉन्ड पेपर-१२ व्याजाने कर्जाऊ दिलेल्या रकमांच्या नोंदी असलेल्या-७ नोंद वहया, राष्ट्रीय बचतपत्र-१ जनावरांचे दाखले-३५ व शेतकऱ्यांच्या जमिनीची मुळ खरेदीखते -५१ व खरेदीखत कायम-४ इत्यांदी दस्ताऐवज आढळुन आलेले आहेत. तसेच त्यानुसार मा. तहसिलदार सिल्लोड यांनी सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन या प्रकरणी सत्वर कार्यवाही केली व संबंधीत तलाठी यांना सत्य परीस्थीतीचा पंचनामा सादर करण्याचे सांगीतले व प्राप्त पंचनाम्यासह त्यांनी त्यांचे पत्र दिनांक १५/०९/२०१४ नुसार अहवाल सादर केला आहे. त्यांतील उपरोक्त नमुद १ ते १७ शेतकऱ्या पैकी खालील नमुद १ ते १५ शेतकऱ्यांच्या जमिनीचा ताबा संबंधीत जमिन खरेदीकरून घेणार यांचेकडे नसुन शेतजमिनीचा ताबा हा प्रत्यक्ष जमिनी खरेदी खत करून देणारे शेतकरी यांचेच ताब्यात आहे. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

MONEYLENDERS AURANGABAD सत्यमेव जयते

अ.क्र	गावाचे नांव	खरेदी खताचे रेकार्डनुसार खरेदी करणाऱ्याचे नांव	खरेदी खताचे रेकार्डनुसार विक्री करणाऱ्याचे नांव	गट व एकुण क्षेत्र	पैकी प्रत्यक्ष जमिन ताबे दाराचे च कसनाराचे नाव
१	धावडा	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	ईश्वर किसन पैठणे रा. धावडा	गट नं.४० क्षेत्र १ हेक्टर २३ आर	ईश्वर किसन पैठणे रा. धावडा
२	धावडा	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	एकनाथ रतन गिरी रा. धावडा	गट नं.३२ क्षेत्र ८० आर	एकनाथ रतन गिरी रा. धावडा
३	धावडा	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	पांडुरंग फकिरा जाधवरा. धावडा	गट नं.३२ क्षेत्र ५ एकर ३० आर	संजय पांडुरंग जाधवरा. धावडा
४	धावडा	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	ज्ञानेश्वर वामनराव भांमरे रा. धावडा	गट नं.७/१ व ७/२ क्षेत्र १ हेक्टर ३० आर	ज्ञानेश्वर वामनराव भांमरे रा. धावडा
५	धावडा	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	एकनाथ तुकाराम दिवटे रा. धावडा	गट नं.२५ क्षेत्र १ हेक्टर ११ आर	एकनाथ तुकाराम दिवटे रा. धावडा

६	धावडा	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	नंदु कचरू दिवटे रा. धावडा	गट नं.६७ क्षेत्र ३५ आर	नंदु कचरू दिवटे रा. धावडा
७	धावडा	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	नंदु कचरू दिवटे रा. धावडा	गट नं.६७ क्षेत्र १४ आर	नंदु कचरू दिवटे रा. धावडा
८	धावडा	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	चंद्रकांत कचरू दिवटे रा.धावडा	गट नं.६७ क्षेत्र ९१ १/२ आर	चंद्रकांत कचरू दिवटे रा.धावडा
९	धावडा	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	यशोदाबाई कचरू दिवटे रा. धावडा	गट नं.६७ क्षेत्र ३२ आर	यशोदाबाई कचरू दिवटे रा. धावडा
१०	धावडा	शोभाबाई सोमनाथ वाणी रा. आमठाणा	यशोदाबाई कचरू दिवटे रा. धावडा	गट नं.६७ क्षेत्र ४२ आर	यशोदाबाई कचरू दिवटे रा. धावडा
११	धावडा	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	यशोदाबाई कचरू दिवटे रा. धावडा	गट नं.६४/१ क्षेत्र १ हेक्टर १९ आर	यशोदाबाई कचरू दिवटे रा. धावडा
१२	तळणी	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	सांडुसिंग कचरू भोपळे रा. तळणी	गट नं.३५४ क्षेत्र ५३ आर	सांडुसिंग कचरू भोपळे रा. तळणी
१३	तळणी	छायाबाई लक्ष्मण विसपुते रा. तळणी	नंदलाल विठ्ठल भोपळे रा. तळणी	गट नं.३५३ क्षेत्र १ .हेक्टर ४९ आर	नंदलाल विठ्ठल भोपळे रा. तळणी
१४	तळणी	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	ब्रिजलाल आसाराम बेडवाल रा. तळणी	गट नं.२६६ क्षेत्र १ हेक्टर ४८आर	प्रेमसिंग हिरालाल भोपळे रा. तळणी
१५	**शिंन्देफळ**	**लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी**	**रघुनाथ महादु कावले रा. शिंन्देफळ**	**गट नं.२६५ क्षेत्र ५६ आर**	**रघुनाथ महादु कावले रा. शिंन्देफळ**

उपरोक्त प्रकरणी चौकशी अंती घेतलेले जाब जवाब मा. तहसिलदार यांचे जमिनीचे ताबे बाबतचा अहवाल व दिनांक १४/०८/२०१४ रोजी श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांचे राहते घरी घेतलेल्या घरझडतीत सापडलेल्या दस्तऐवजावरून चौकशी अंती ज्यांची खरेदीखते आढळुन आली त्यापैकी २५ शेतकऱ्यांनी व खरेदीखतांवरील साक्षीदारांनी ती खरेदीखते व्याजाने घेतलेल्या रक्कमेस आड म्हणुन करून दिल्याचे त्यांनी चौकशी अधिका-यांना दिलेल्या लेखी जवाबात लिहुन दिलेले आहे.

तसेच पुढील ५ प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांनी श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांचेकडुन कर्ज घेऊन त्यांना जमिनीचे खरेदीखत करून दिले व त्या शेतकऱ्यांनी कर्जाची सव्याज परत फेड केल्या नंतर श्री. विसपुते यांनी त्याच शेतकऱ्यांना अथवा त्या शेतकऱ्याच्या कुटुंबातील सदस्यांना त्याच जमिनी पलटवुन देण्या बाबतचे खरेदीखत करून दिलेले असल्याचेही सिध्द झालेले आहे.

तक्ता:-१

अ.क्र	खरेदीखत क्र.व दि.	खरेदीखत करून देणार	व खरेदी खत करून घेणार	खरेदी खत करून घेणा-याचे परत खरेदी खत खत करुन देणा-यासी नाते
१.	२४५६ दि.९/६/०९	श्री.बाबुलाल शंकर बावस्कर रा.धावडा	श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा.तळणी	स्वत:
२.	१९६८दि.१९/४/०५	श्री.कचरु संतु भोपळे रा.तळणी	श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा.तळणी	वडील
३.	१६६० दि.१/४/०५	श्री.दौलत बसी महेर रा.उपळीवाडी	श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा.तळणी	वडील
४	३९६०दि.२/९/०४	श्री.गणेश विठ्ठल भोपळे रा.तळणी	श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा.तळणी	भाऊ
५	३६२८ दि.११/६/०१	श्री.कडुबा बाबुराव वाघ रा.तळणी	श्रीमती छायाबाई लक्ष्मण विसपुते रा. तळणी	पती

तक्ता:-२

अ.क्र	खरेदीखत क्र.व दि.	खरेदीखत करून देणार	व खरेदी खत करून घेणार	खरेदी खत करून घेणा-याने परत खरेदी खत करुन देणा-यासी नाते
१.	३२९५ दि.१७/६/१४	श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	श्री.बाबुलाल शंकर बावस्कर	स्वत:
२.	१७१४,दि.१४/५/०८	श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	श्री.सांडुसिंग कचरूसिंग भोपळे	मुलगा
३.	३५०१ दि.२६/७/१०	श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	श्री.पोपट दौलत महेर	मुलगा
४	२७३२ दि.२६/४/०५	श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	श्री.नंदलाल विठ्ठलसिंग भोपळे	भाऊ
५	४१८६ दि.२१/१०/१०	श्रीमती छायाबाई लक्ष्मण विसपुते रा. तळणी	श्रीमती मालताबाई कडुबा वाघ	पती

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD

तसेच सदर तक्रार अर्जात उल्लेख असलेले १) श्री.एकनाथ रतन गिरी रा.धावडा ता.सिल्लोड २) श्री.पांडुरंग फकिरा जाधव रा.धावडा ३) श्री. ज्ञानेश्वर वामन भामरे ४) श्री.एकनाथ तूकाराम दिवटे ५) श्री.नंदु कचरू दिवटे रा.धावडा ६) श्री.सांडु भोपळे रा.तळणी ७) श्री. नंदलाल विठठल भोपळे रा.तळणी ८) श्री.बाबुलाल फुलसिंग रा.[illegible]वाडी हे शेतकरी व त्यांच्या खरेदीखतावरील १) श्री.नंदु कचरू दिवटे रा.धावडा २) ज्ञानेश्वर वामनराव भामरे रा.धावडा साक्षीदारांनी प्रत्येकी रू.१०० च्या बॉन्डवर श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांनी व्याजाने पैसे दिल्या बाबतची शपथपत्रे सादर केलेली आहेत.तसेच सदर प्रकरणी चौकशी अधिकारी यांनी मा. तहसिलदार, सिल्लोड यांना दि.२६/८/२०१४ व दि.५/९/२०१४ नुसार केलेल्या विनंती नुसार त्यांनी १) श्री.ईश्वर किसन पैठणे २)श्री.एकनाथ रतन गिरी ३) श्री.पांडुरंग फकिरा जाधव (मयत) ४) श्री.ज्ञानेश्वर वामन भामरे ५) श्री.एकनाथ तूकाराम दिवटे ६) श्री.नंदू कचरू दिवटे तसेच नंदू कचरू दिवटे , श्री.चंद्रकांत कचरू दिवटे,यशोदाबाई कचरू दिवटे यांच्या जमिनी गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांनी परस्पर दुस-यांस विकलेल्या जमिनीच्या ताब्याबाबत संबंधीत तलाठयांकडुन करवुन घेतलेल्या पंचनाम्यांनुसार शेतकऱ्यांनी खरेदीखत करून दिलेल्या जमिनींचा ताबा श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांचेकडे नसुन त्या त्या शेतकऱ्यांकडेच असल्याचे तलाठी यांचा दि.१५/९/२०१४ च्या पंचनामा अहवालात निदर्शनास आले आहे. त्यामध्ये अर्जदार श्री.रघुनाथ महादु कावले यांचेही सदर शेताचा पंचनामा दि.३०/८/२०१४ नुसार ताबा व पिक पेरा असल्याचे आढळून आले आहे.

श्री. रघुनाथ महादु कावले रा. शिंन्देफळ ता. सिल्लोड यांनी श्री. लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी ता. सिल्लोड यांचेकडुन व्याजाने रक्कम घेतली असुन या रकमेस आड म्हणुन त्यांनी त्यांचे नावे असलेली गट नं.२६५ मधील ५६ आर शेतजमिन त्यांचे नावे करून दिलेली आहे. या व्यवहारातील साक्षदार श्री. रमेश हरीचंद्र वाघ रा. शिंन्देफळ ता. सिल्लोड यांनी सदर जमिनीचा व्यवहार हा खरेदी विक्रीचा नसुन सावकारी व्यवहारात

जमिन परत पलटविण्याची तोंडी बोली ठेऊन जमिन श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांचे नावावर लिहुन दिलेली आहे. असा जवाब लिहुन दिलेला आहे. तसेच मा. तहसिलदार यांचे दिनांक १५/०९/२०१४ चे पत्रानुसार त्यांनी याबाबत तलाठी शिंन्देफळ सजा यांचा पंचनामा पाठविलेला असुन त्यानुसार सदरहु जमिन श्री.रघुनाथ महादु कावले यांचेच ताब्यात आहे. ते त्या जमिनीवर पिक घेत आहे. श्री. लक्ष्मण भिका विसपुते रा.तळणी यांचे घरी दिनांक १४/०८/२०१४ रोजी घेतलेल्या घरझडतीत त्यांचे घरी श्री. रघुनाथ महादु कावले यांचे बाबत वरील नमुद शेतजमिनीची रजिस्ट्री सापडलेली आहे. तसेच त्यांचे घरी सापडलेल्या नोंदवही क्र. १ मधील पान क्र. १९ वर रू. ४००००/- ३% दराने व पान क्र. ४८ वर रू. १५०००/- ५% दराने दिल्याची नोंद आहे. व वही क्र. ५ पान क्र. ९८ वर रू.१२०००/- बाकी घेण्यांची नोदं आहे.

उपरोक्त मिळालेले पुरावे हे अवैध सावकारी संबंधीत आहे. हि बाब व पुरावे विचारात घेता श्री. रघुनाथ महादु कावले यांचे शेतजमिनीचा व्यवहार हा खरेदी विक्रीचा नसुन अवैध सावकारीत असल्याचे सकृत दर्शनी दिसुन येत असल्याने सदरची जमिन परत पलटवुन देणे साठी कार्यवाही होणे योग्य आहे.

उपरोक्त बाबींवरून वरून श्री. लक्ष्मण भिका विसपुते, रा. तळणी, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद हे बेकायदेशीर रित्या सावकारी करीत असल्याचे चौकशी अंती. स्पष्ट दिसुन येते.त्याबाबत गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिकाजी विसपुते यांना चौकशी अधिकारी यांनी म्हणणे मांडण्याची संधी दिलेली आहे. त्यांनी चौकशी अधिकारी यांचेसमोर दि.२८/८/२०१४ रोजी तसेच सुनावणीमध्ये या कार्यालयानेही दि.१७/१०/२०१४ व दि.२/१२/२०१४ रोजी नोटीस देवून त्यांचे सदर व्यवहाराबाबत म्हणणे मांडण्याची दि.१७/११/२०१४ , दि.२/१२/२०१४ व दि.२२/१२/२०१४ चे सुनावणीमध्ये संधी दिलेली आहे.

अर्जदार, श्री. रघुनाथ महादु कावले रा.शिंदेफळ ता. सिल्लोड जि. औरंगाबाद यांनी तक्रारीत नमुद केलेल्या बाबी व त्या अनुषंगाने चौकशी अधिकारी यांचा इत्यंभूत चौकशी अंती सादर केलेला दि.२५/९/२०१४ रोजीचा चौकशी अहवालातील वरील प्रमाणे निष्कर्ष गैरअर्जदाराच्या वतीने सादर केलेला खुलासा व या कार्यालयातील सुनावणी दिनांक १७/११/२०१४, दि.२/१२/२०१४ आणि दि.२२/१२/२०१४ रोजीचे सुनावणी दरम्यान मांडलेले तोंडी व लेखी म्हणणी,अर्जदार श्री .रघुनाथ महादु कावले रा.शिंन्देफळ यांचा गट.क्र.२६५ मधील ५६ आर जमीनीचा अर्जदाराच्या प्रत्यक्ष ताबा विचारात घेता पुढील बाबी निदर्शनास येतात

१) गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांचे तळणी येथे दि.१४/८/२०१४ रोजी घेतलेल्या घरझडती मध्ये सापडलेले आक्षेपार्ह दस्तऐवज जसे १) कोरे सहया असलेले बॉन्ड -१२ २) कोरे धनादेश -२३ ३) बँक पासबुक -६ ४) राष्ट्रीय बचतपत्र-१ ५) नोंदणी व सुट्टे कागद-१९ ६) नोंदवहया -७ ७) जनावराचे दाखले-३८ ८) खरेदी खत-५१ ९) उसनवार पावती-४ १०) खरेदीखत कायम-४ इ.कागदपत्र तसेच उपरोक्त जमीन खरेदी विक्री व्यवहारापैकी गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांनी खरेदी केलेल्या जमिनी ५ परत त्याच व्यक्तींना पुन्हा सदर जमीन परत करणे यावरुन सदरचे खरेदी व्यवहार सावकारी संदर्भाने सदर जमीनीवर खरेदीखत प्रतिभुती होती हे अर्जदार श्री.रघुनाथ महादु कावले यांचे म्हणण्यास पुष्ठी देणारे आहेत.

सबब अर्जदार श्री. रघुनाथ महादु कावले रा.शिंदेफळ ता. सिल्लोड जि. औरंगाबाद मौजे शिंदेफळ शिवारातील गट नं.२६५ मधील ५६ आर जमीन गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांचे नावांवर असुन सदर जमिनीचा ताबा अर्जदार श्री. रघुनाथ महादु कावले यांचे कडे असल्याचे आढळुन आल्यामुळे सदर जमीन मुळ विक्रीदार

श्री. रघुनाथ महादु कावले यांनी सावकारीपोटी प्रतिभुती म्हणुन गहाण ठेवलेली आहे. म्हणून सदर खरेदीखत क्र.२०१९ दिनांक ४/४/२००१ त्यांच्या नावाने परत करणे ही बाब जमिनीचा प्रत्यक्ष ताबा अर्जदाराकडे असल्यामुळे त्यांचे बाजुने आहे. म्हणुन सदर खरेदीखत सावकारीच्या ओघात प्रतिभुती म्हणुन दिले असल्याची माझी खात्री झाली आहे.त्यामुळे सदर खरेदी खतामधील मौजे शिंदेफळ येथील गट नं.२६५ मधील ५६ आर जमीनीचे खरेदीखत अवैध असल्याचे घोषित करून अर्जदार श्री. रघुनाथ महादु कावले यांना परत करणे करीता पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

मी, एन.व्ही.आघाव, सावकारांचे निबंधक तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद ; महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ (२) नुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते, रा.तळणी, ता.सिल्लोड यांना मौजे शिंन्देफळ शिवारातील गट नं. २६५ मधील ५६ आर जमीनीचे करुन दिलेले खरेदीखत क्रमांक २०१९/२००१ दिनांक ०४/०४/२००१ महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ (२) अन्वये अवैध असल्याचे घोषित करण्यात येत आहे आणि सदर खरेदीखतामधील जमीन अर्जदार हस्तांतरणकार मुळ मालक श्री.रघुनाथ महादु कावले यांना परत करण्यात येत आहे. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ (६) नुसार, संबंधीत सक्षम अधिकारी यांनी या आदेशाच्या अंमलबजावणींतर्गत सदर जमीनीचा तसा फेरफार करावा.

सदर आदेश आज दिनांक ३० /०१/२०१५ रोजी माझी सही व कार्यालयाच्या मुद्रेसह पारीत केला आहे.

(एन.व्ही.आघाव)
सावकारांचे जिल्हा निबंधक
तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था औरंगाबाद

प्रत -

१.मा.उप विभागीय अधिकारी सिल्लोड यांना पुढील कार्यवाहीस्तव माहितीस्तव.
२.मा.तहसिलदार सिल्लोड यांना योग्य त्या पुढील कार्यवाहीस्त देण्यात येते.
३.तलाठी सजा शिंन्देफळ ता.सिल्लोड यांना देऊन कळविण्यात येते की,उक्त प्रकरणात योग्य ती कार्यवाही करावी.
४. सहाय्यक निबंधक ,सहकारी संस्था, सिल्लोड यांना त्यांचा चौकशी अहवाल दि.२५/९/२०१४ च्या संदर्भात

प्रत माहितीस्तव सविनय सादर.-

१.मा.सहकार आयुक्त व निबंधक ,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे
२.मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद

सावकारांचे जिल्हा निबंधक
तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था औरंगाबाद